दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २५७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५


**मराठी सुविचार**

दिवसातील सर्वात आनंददायक क्षण म्हणजे पहाटेची वेळ. म्हणून ब्रह्ममुहूर्तावर उठणे चांगले






# अतिशय धक्कादायक, हैराण करणारी घटना

## प्रेमभंगातून तरुणाचे टोकाचे पाऊल, आयुष्याचा केला शेवट...

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२७, जळगाव :**

जळगावातून एक अतिशय धक्कादायक आणि हैराण करणारी घटना पुढे येताना दिसतंय. प्रेमभंगातून एका तरुणाने टोकाचे पाऊल उचलत आयुष्याचा शेवट केलाय. हेच नाही तर त्याने सोशल मीडियावर आपल्या मुलीसोबतचे फोटो शेअर केले आणि थेट आत्महत्या केली. धक्कादायक म्हणजे त्याने महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या झाडालाच गळफास घेतलाय. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतलीये. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या तरुणाचा प्रेमभंग झाला होता.

नूतन मराठा महाविद्यालयाच्या आवारात तरुणाने संपवले आयुष्य

अधिक माहिती अशी की, जळगाव शहरातील नूतन मराठा महाविद्यालयाच्या आवारात तरुणाने



झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. प्रेमभंगातून तरुणाने आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती देखील मिळतंय. सत्तू कोळी असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. सत्तू कोळी याने आत्महत्या करण्याच्या अगोदर मुलीसोबतचे काही फोटो हे सोशल मीडियार स्टेट्स ठेवले आणि मग टोकाचा निर्णय घेतला.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवला. पोलीसांकडून या प्रकरणी अधिकचा तपास हा केला जातोय. नूतन मराठा महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या झाडावर तरुणाने गळफास घेतल्याने शहरात मोठी खळबळ निर्माण झाल्याचे बघायला मिळाले. प्रेमभंगातून तरुणाने आत्महत्या केल्याची माहिती आहे.

**घटनेची माहिती कळताच मोठी खळबळ...**

सत्तू कोळी याच्या आत्महत्येनंतर पोलिस तपास करत असून या प्रकरणात काही मोठे खुलासे होतात का? हे देखील पाहण्यासारखे ठरणार आहे. सत्तू कोळी याच्या आत्महत्येनंतर त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसल्याचे बघायला मिळतंय. सत्तू कोळी याने मुलीसोबतचे फोटो सोशल मीडियावर ठेऊन टोकाचा निर्णय घेतला. सत्तू कोळी याने आत्महत्या करण्यापूर्वी एक व्हिडीओ देखील शेअर केला. या व्हिडीओमध्ये तो माफ करा म्हणताना देखील दिसतोय. मायला सांभाळा म्हणत आहे. माझ्याकडून काही चुकीचे होत आहे, हे मला समजत होते, असेही तो म्हणतोय.

## थोडक्यात

### पहलगाम भ्याड हल्ल्याचा निषेध करुन केंद्र सरकारच्या निर्णयाला पाठिंबा...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, लोणार (बुलडाणा) :** काश्मीर खोऱ्यातील पहलगामच्या बैसरन घाटी भागात दहशतवाद्यांनी २२ एप्रिल रोजी भ्याड हल्ला केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या बेछूट गोळीबारात २८ जणांचा मृत्यू झाला. नावं विचारून, आयकार्ड पाहून दहशतवाद्यांनी पर्यटकांना ठार मारल्यानं हा टार्गेट किलिंगचाच प्रकार मानला जातोय. या घटनेनं देश हादरला असून, 'दोषींना सोडणार नाही' असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिला.

लोणार तालुक्यातील गुंधा येथे २६ एप्रिल शनिवार ला शेतकरी संघटनेचे नेते व लोणार कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक शिवप्रसाद सारडा यांच्या पुढाकाराने सभेचे आयोजन करण्यात आले सभेत बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.नुकताच काश्मीरमधील पहलगाम येथे पाक प्रशिक्षित हल्लेखोरांनी नाव व धर्म विचारून केवळ हिंदूंना लक्ष करून त्यांच्यावर गोळ्या झाडून २८ जणांची निर्घुण हत्या करण्यात आलीअनेक जण जखमी झाले या घटनेने निष्पाप लोकांचा तर बळी घेतलाच पण एक प्रकारे देशाच्या नेतृत्वाला खुले आव्हान सुद्धा दिले संपूर्ण देश या घटनेने हादरून गेला.काश्मीरला विशेष अधिकार देणारे कलम ३७० व सुधारित वक्फ बोर्ड कायदा ज्यांना पचला नाही अशा जहाल मतवादी लोकांनी असे कृत्य करून देशाला खुले आव्हान दिले आहे.सभेचे अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आश्रुजी तिरके हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच तसा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती केशवराव फुके हे होते. या सभेला बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते या सभेमध्ये सुरेशराव कांदे, जयदत्त येऊल, राधेश्याम तिरके, अशोकराव कास्तोडे,डॉ.गजानन बाजड, गजानन माने सरपंच, गोविंद राऊत उपसरपंच, केशवराव फुके, जयदत्त येऊल शिवप्रसाद सारडा यांनी विचार मांडून तीव्र शब्दात हल्ल्याचा निषेध केला व केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर निर्णयाचे स्वागत केले व जनता केंद्र सरकारच्या भूमिकेशी सहमत असून सरकारच्या पाठीशी जनता आहे असे ठासुन सांगितले, सूत्रसंचालन उपसंरपंच गोविंद राऊत यांनी केले 'पाकिस्तान मुर्दाबाद' च्याघोषणा उत्स्फूर्तपणे देण्यात आल्या.शेवटी पसायदान घेऊन सभेचा समारोप करण्यात आला.

### पुण्याच्या विवाहितेची बॉडी नाशकात...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, : इंदापूर :** पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील कळाशी येथील २६ वर्षीय विवाहित महिलेचा पतीनेच खून केल्याची घटना घडली आहे. विशेष बाब म्हणजे तीन महिन्यांपूर्वी सदर महिला बेपत्ता असल्याची तक्रार पतीनेच दिली होती. यामध्ये पतीनेच तिचा खून करून मृतदेह नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील ढेकुगाव ते परधाडी घाटात निर्जनस्थळी टाकून दिल्याचं इंदापूर पोलिसांनी केलेल्या तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे तब्बल तीन महिन्यानंतर या खुनाचा उलघडा झाला आहे. याप्रकरणी महिलेचा पती जोतीराम आबा करे आणि त्याचा मित्र दत्तात्रय शिवाजी गोलांडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, २९ जानेवारी २०२५ रोजी प्रियंका जोतीराम करे (वय-२६ वर्षे, रा. कळाशी, ता. इंदापूर) या बेपत्ता झाल्याची तक्रार इंदापूर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानंतर इंदापूर पोलिसांनी सखोल तपास करीत पुढे आलेल्या माहितीवरून, सुधीर भिमराव काळे (वय-४१ वर्षे, पोलिस हवालदार, इंदापूर पोलिस ठाणे) यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीनुसार २७ जानेवारी २०२५ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास जोतीराम आबा करे (वय-३४ वर्षे, रा. कळाशी ता. इंदापूर) व दत्तात्रय शिवाजी गोलांडे (रा. गोलांडे वस्ती, इंदापूर, ता. इंदापूर) यांनी संगनमताने मौजे कळाशी, ता. इंदापूर गावचे हददीत राहते घरी बेपत्ता महीला प्रियंका जोतीराम करे (वय-२६ वर्षे, रा. कळाशी, ता. इंदापूर) हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन, तुझे वागणे बरोबर नाही, त्यामुळे आमची नातेवाईक व जनमाणसात बदनामी होत आहे, असे म्हणून गळा दाबून तिची जीव घेतला.

## 'मुंबई इंडियन्स' चा सलग पाचवा विजय ; टीमचा मोठा कमबॅक !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२७, मुंबई :**

मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्सचा सामना वानखेडे वर आज रंगला. या सामन्यात नाणेफेक लखनौ सुपर जायंट्सने जिंकले आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने २१५ धावा केल्या, याउलट लखनौने १६१ धावा केल्या आणि सामना मुंबईने ५४ धावांनी जिंकला. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबईने लीग स्टेजमध्ये लखनौचा पराभव केला आहे. मुंबईचा हा १० सामन्यांतील सहावा विजय आहे. यासह, एमआय आता पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर आला आहे.

प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत २१५ धावा केल्या. प्रत्युत्तरात लखनौ संघाला फक्त १६१ धावा करता आल्या. लखनौचा हा १० सामन्यांतील पाचवा पराभव आहे. लखनौ संघ आता पॉइंट्स टेबलमध्ये सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. मुंबईने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना लखनौची सुरुवात चांगली झाली नाही. एडेन मार्क्रमला फक्त ०९ धावा करता आल्या. यानंतर मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांनी जलद धावा काढल्या. लखनौने पॉवरप्लेमध्ये एका विकेटच्या मोबदल्यात ६० धावा केल्या होत्या पण त्यानंतर संघाने आपली लय गमावली आणि नियमित अंतराने विकेट गमावल्या.



मिचेल मार्श २४ चेंडूत ३४ धावा करून बाद झाला. त्याने ३ चौकार आणि २ षटकार मारले. १५ चेंडूत २७ धावा काढून निकोलस पूरन पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच्या बॅटमधून एक चौकार आणि तीन षटकार आले. पुन्हा एकदा कर्णधार ऋषभ पंतची बॅट शांत राहिली. तो फक्त ०४ धावा करू शकला. आयुष बदोनीने २२ चेंडूत ३५ धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि दोन षटकार मारले. डेव्हिड मिलरला १६ चेंडूत फक्त २४ धावा करता आल्या. अब्दुल समदही स्वस्तात बाद झाला. तो दोन धावा करून बाद झाला.

मुंबईकडून जसप्रीत बुमराहने ४ षटकांत २२ धावा देत ४ बळी घेतले. विल जॅक्सने दोन विकेट घेतल्या. जॅकने पूरन आणि पंत यांचे बळी घेतले. ट्रेंट बोल्टने २० धावा देऊन तीन विकेट घेतल्या. मुंबईकडून सर्वाधिक धावा रियान रिकेल्टन आणि सूर्यकुमार यादवले केल्या. रियान रिकेल्टन ५८ धावा केल्या तर सूर्याने ५४ धावा केल्या.

## गुंगीचं औषध अन् ३ अल्पवयीन मुलींसोबत घाणेरडं कृत्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, नागपूर :** नागपूर शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली एक घृणास्पद प्रकार उघडकीस आला आहे. पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून एका भोंदूबाबाने मध्यरात्री नग्न पूजा करण्याचा बनाव रचला आणि या दरम्यान तीन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केला. या संतापजनक घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाच आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना तीन दिवसांपूर्वी घडली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी भोंदूबाबा असून त्याचे खरे नाव अब्दुल कुरैशी उर्फ कुणाल मदने (कनवर्टेड) आहे आणि तो मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहतो. दुसरा आरोपी आशू उर्फ अश्लेष कोचे कपिलनगर पोलीस ठाणे परिसरात राहतो आणि त्याच्यासोबत असलेली त्याची मैत्रीण गायत्रीही या




गुन्ह्यात सहभागी आहे. या दोघांव्यतिरिक्त आणखी दोन जणांना पोलिसांनी अटक केली आहे, ज्यांनी मुलींचा शोध घेण्यासाठी मदत केली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल कुरैशी नावाच्या भोंदूबाबा याने असा दावा केला होता की मध्यरात्री नग्न पूजा केल्यास पैशाचा पाऊस पडेल. या नग्न पूजेसाठी अल्पवयीन मुलींची आवश्यकता असल्याचे त्याने आशू उर्फ अश्लेष कोचे आणि त्याच्या साथीदारांना सांगितले. पैशाच्या हव्यासापोटी

अश्लेष कोचे आणि त्याच्या महिला मैत्रीण गायत्रीने त्यांच्या दोन मित्रांच्या मदतीने गरीब कुटुंबातील तीन अल्पवयीन मुलींना हेरले. त्यांनी मुलींना पैशांचे आमिष दाखवले आणि पूजेच्या नावाखाली मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या भोंदूबाबाच्या घरी आणले. रविवारी मध्यरात्री या ठिकाणी भोंदूबाबाने नग्न पूजेचा केवळ देखावा केला नाही, तर त्या या निष्पाप मुलींवर अत्यंत घृणास्पद अत्याचार केले. या गंभीर घटनेनंतर पोलिसांनी तातडीने पाऊले उचलत पाचही आरोपींना ताब्यात घेतले आहे. भोंदूबाबाने यापूर्वीही अशा प्रकारचे कृत्य करत असावा, असा पोलिसांना संशय आहे. मुलींचा शोध घेण्यासाठी अन्य दोन आरोपींची मदत घेतल्याने, हे कृत्य पूर्वनियोजित असल्याचे दिसते. अंधश्रद्धेचा गैरफायदा घेऊन भोंदूबाबाने आणि आशूने यापूर्वीही अशाच प्रकारचे गुन्हे केले असावेत, या दृष्टीने पोलीस तपास करत आहेत. तसेच, भोंदूबाबा सेक्स रॅकेट चालवत असल्याच्या संशयावरूनही त्याची कसून चौकशी सुरू आहे.

# संपादकीय



## मोबाईलपेक्षा मुलं महत्त्वाची!

मैदानावरून धावत होतो. योग कट्ट्यावर पती-पत्नी आणि त्यांचे छोटेसे मूल, साधारणतः दोन ते तीन वर्षांचे, दोघांच्या मध्ये लुडबुडत होते. मुलाच्या आई-बाबांच्या हातात मोबाईल होते. दोघे मोबाईल पाहण्यात दंग होते. मूल दोघांच्या साद-प्रतिसादाची व्याकुळतेने वाट पाहत होते. मुलाला आईकडून प्रेम, मायेची उब हवी होती; तर वडिलांकडून शाबासकी, हिंमत आणि सुसंवाद हवा होता. पण त्या दोघांकडून काहीच मिळत नव्हते. दोघे मोबाईललाच आपला सखा-सोबती मानून त्यालाच साथ देत होते. बिचारा मुलगा अश्रूंनी डोळे भरून रडू लागला, तरी जन्मदात्या आई-बाबांना त्याच्यासाठी मायेचा पाझर फुटत नव्हता. ते एकमेकांकडे पाहत पुन्हा मोबाईलमध्ये गुंग झाले. शेवटी मुलाने मोठ्याने टाहो फोडला. आईने म ोबाईल एका हातात आणि मूल दुसऱ्या हातात धरून आपल्या मायेची मोबाईल आणि मुलामध्ये समान वाटणी केली.

आज माणसाचं पानही मोबाईलशिवाय हालत नाही. अशा काळात मुलांचे संगोपन करण्यात मोबाईल मोठा अडथळा ठरत आहे. मुलांशी सुसंवाद घडला नाही, तर वय वर्षे १ ते १४ पर्यंतच्या मुलांच्या तीव्र जिज्ञासांना पंख लावता येणार नाहीत. त्यांची सर्जनशीलता, नवनिर्मितीची आणि ज्ञान- माहिती मिळवण्याची ओढ कमी होईल. मुलांशी सुसंवाद घडला तरच त्यांना संस्कार देता येतील. मोबाईलवर प्रेम करणाऱ्या आई-बाबांकडे पाहून मुलांमध्ये नक्कीच न्यूनगंडाची भावना निर्माण होत असेल.

'मुलं ही पालकांचे अनुकरण करतात' या सूत्रानुसार पुढे ही मुलंही पालकांसारखी मोबाईलला चिकटतात.त्यांचा स्क्रीन टाइम वाढतो. ही मुलं शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या अप्रगत राहू शकतात . मोबाईल की मुलं...? हा प्रश्न पालकांनी आता धाडसाने सोडवला पाहिजे. मोबाईल वापरण्याची स्वतः ची आचारसंहिता तयार केली पाहिजे. मुलांना मोबाईलचा पर्याय न देता कृतीला वाव देणारी खेळणी द्यायला हवीत. मुलांशी सतत संवाद साधायला हवा, त्यांच्या भावना समजून घ्यायला हव्यात. वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत मुलांचा पाच हजार शब्दांचा शब्दसंग्रह होणं अत्यावश्यक असतं. त्यामुळे श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या भाषा शिक्षणाच्या पाया मजबूत होतो. मोबाईलमुळे कमी ऐकवलं गेलं तर पुढील सर्व टप्पे ढासळू शकतात.

आजकालची लहान मुलं देखील म ोबाईलच्या आहारी गेली आहेत. मोबाईल पाहत पाहत जेवण्याची सवय त्यांना त्यांच्या आईकडून लागते. यातून मुलांना काय खातात आणि किती खातात हे समजत नाही. अन्नाबद्दल गोडी निर्माण होत नाही. मन लावून अन्न खाल्ल्यासच पोषक तत्त्वे मिळतात आणि बुद्धी तल्लख व शरीर सुदृढ होते. मोबाईलमुळे संवाद हरवला आहे. याची जाणीव सर्वांना होत आहे. पूर्वी आजी-आजोबा आपल्या नातवंडांशी संवाद साधायचे. गप्पा, गोष्टी घडायच्या. आज विभक्त कुटुंबपद्धतीमुळे ही पोकळी मोठी आहे. ती सुद्धा भरून काढण्याचे काम आई बाबांना करायचे आहे.

मुलांचं संगोपन घोड्यावर स्वार होण्यासारखं आहे. कधी गतीला अनुसरावं लागतं, कधी लगाम घट्ट करावा लागतो. मुलांशी संवाद साधण्याचं तंत्र पालकांनी शिकलं पाहिजे. मोबाईलमध्ये सतत तोंड खुपसून हे शक्य होणार नाही.

पालकत्व हे कोणत्याही शाळेत शिकवलं जात नाही. ते स्वतःच्या अनुभवातून आत्मसात करावं लागतं. मुलांमधील गुण ओळखून त्यांना संधी उपलब्ध करून देणं आवश्यक आहे.

खोटं न बोलणं, मदत करणं, सार्वजनिक जीवनात सहभागी होणं, हे मुलांना शिकवायचं असेल तर मोबाईल बाजूला ठेवावा लागेल. म ुलांमध्ये समाजावर विश्वास वाढवणाऱ्या गोष्टींवर भर द्यायला हवा.

शेवटी, मुलांसाठी मोबाईल स्विच ऑफ करून गुणवत्तापूर्ण वेळ द्यायलाच हवा!

# साहित्यिक कौशल्य : बौद्धिक संपदाच!



जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी २६ एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन २००० साली या दिवसाची स्थापना करण्यात आली. जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो, ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाययचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाययचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय. प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आलीअसावी. ग्रीक, लॅटीननंतर नंतर १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन १६२०च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉईटिंग्ज ऑफ अनादर, दी क्राईम ऑफ लिटररी थीफ्ट अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटीन प्लेजिअरिअस हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

बौद्धिक संपदा म्हणजे काय? तर बौद्धिक संपदा- आईपी मनाच्या निर्मितीचा संदर्भ देते, जसे की आविष्कार; साहित्यिक आणि कलात्मक कामे, रचना आणि वाणिज्यमध्ये वापरलेली चिन्हे, नावे आणि प्रतिमा आईपी कायद्यामध्ये संरक्षित आहेत. उदाहरणार्थ, पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क, जे लोकांना त्यांनी जे काही शोध लावले किंवा तयार केले त्यापासून मान्यता किंवा आर्थिक लाभ मिळवण्यास सक्षम करते. नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित यांच्यातील योग्य संतुलन साधून, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता वाढू शकेल अशा वातावरणाला प्रोत्साहन देण्याचे आईपी शासनाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बौद्धिक संपदा संघटना ही जागतिक बौद्धिक संपदा दिन स्थापन करण्यासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. संस्था बौद्धिक संपदा धोरण, सेवा आणि सहकार्यासाठी जागतिक मंच म्हणून काम करते. डब्ल्यूआईपीओ ही १९३ सदस्य राष्ट्रांसह स्व-वित्तपुरवठा करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. नॅशनल अल्जेरियन इंडस्ट्रियल प्रॉपर्टी इन्स्टिट्यूट-आईएनएपीआईच्या महासंचालकांनी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची स्थापना सुरू केली. हा दिवस कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि पेटंटबद्दल जागरूकता निर्माण करतो. हे कायदे आणि नोंदणी आहेत जे निर्माते आणि नवोदितांच्या मूळ कार्याचे संरक्षण करतात. यामध्ये लेखक, कलाकार, शोधक आणि ब्रँड यांचा समावेश असू शकतो जे निर्मात्यांना त्यांच्या कामाचे अधिकार आहेत, याची खात्री करण्यात मदत करतात. बौद्धिक संपदा नियम अधिक विकासास प्रोत्साहन देतात. मूळ कामाची पायरसी रोखण्यासाठी, निर्मात्यांना त्यांच्या आविष्कारांची पूर्ण मालकी असावी या कल्पनेला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा नियम असणे महत्त्वाचे आहे. बौद्धिक मालमत्तेची चोरी युनायटेड स्टेट्समध्ये दरवर्षी सुमारे २२५ अब्ज ते ६०० अब्ज खर्च करते. हे नियम निर्माते आणि देशाचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यात मदत करतात.

- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

**!! जागतिक बौद्धिक मालमत्ता दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

## हल्ला..

पहेलगामी हल्ला
अति सुन्न हो मति
निषेधाचे पडसाद
संतापसळे जगति

सिंधु करारा दिली
नाईलाजे स्थगिती
पाकड्यांची चालू
अगतिकअधोगति

आतंकवादा उत्तर
निरुत्तर करे प्रगति
पाणीबाणी करता
हो धान्य अनुत्पत्ति

पळेलं तोंडचेपाणी
अर्थकारणआपत्ती
वॉटरस्टाईक होता
घाम गाळेलं उन्नती

युध्दात सगळे क्षम्य
नाही मुळी अनीती
कुटाळखोरविदुषक
करावी फटफजिती

भ्याड हल्ला करुन
विक्रीस काढे प्रिती
रक्ता सोबत धडाडा
वाहूनचालली नीती

शेजारधर्म विसरला
पाक गमावतोनाती
उदार भारत नाराज
कटोरा देणारं हाती

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# आतंकवादी हल्ल्यानंतर आपण बोध घेतो का ?

पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर देशभरातील जनता पेटून उठली असून आतंकवादाविरोधी नरमाईची भूमिका आता पुरे, आतंकवादाच्या उच्चाटनासाठी आतंकवादाची जन्मभूमी असलेल्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा अशी मागणी एकमुखाने केली जात आहे. या हल्याचा देशाच्या कानाकोपऱ्यातून निषेध केला जात असून या घटनेवरून राजकारणही तापले आहे. या सर्वांचा परिणाम सत्तेवर असलेल्या सरकारवर झाला असून या घटनेनंतर माननीय पंतप्रधानांनीही या हल्यास जबाबदार असलेल्या कोणालाही सोडणार नसल्याचे सांगितले आहे. काही ठोस निर्णयही घेण्यात आले असून भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांना याविषयीचे निर्देश दिले आहेत. यानुसार कार्यवाही करतांना महाराष्ट्रात पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांना तत्परतेने देश सोडून निघून जाण्यास सांगण्यात आले आहे. अंतर्गत सुरक्षा यंत्रणाही त्यासाठी कामाला लागली असून देशासह राज्यात पाकिस्तानी नागरिकांचा शोध घेत असताना धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी एका वृत्तवाहिनीला माहिती देताना म्हटले आहे की महाराष्ट्रातील ४८ शहरांमध्ये तब्बल ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक आहेत ज्यांच्यापैकी केवळ ५१ जणांकडेच वैध कागदपत्रे आढळली आहेत. याचा अर्थ ४ हजार ९७२ पाकिस्तानी महाराष्ट्रात अवैधरित्या वास्तव्य करत आहेत. त्याहून धक्कादायक प्रकार म्हणजे यांपैकी १०७ पाकिस्तानी गायब आहेत. पोलिसांनी जागोजागी शोध घेऊनही ते सापडलेले नाहीत. ही केवळ अधिकृत माहिती असून प्रत्यक्ष आकडा याहून भयावह असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अधिकृत आकडेवारीचा जरी विचार केला तरी १०७ ही आकडेवारी कमी नाही. हे १०७ पाकिस्तानी राज्यात कोणकोणत्या ठिकाणी



विखुरले आहेत ? त्यांना कोणी आश्रय दिला आहे ? येणाऱ्या काळात राज्यात मोठी आतंकवादी कारवाईची करण्याची सिद्धता तर ते करत नाहीत ना याविषयी कोणतीच माहिती सरकारकडे आज उपलब्ध नाही. योगेश कदम म्हणाले, ''व्हिसा कालावधी संपलेल्या पाकिस्तानी नागरिकांशी भारतीय यंत्रणा संपर्क साधून त्यांना पुन्हा त्यांच्या म ायदेशी पाठवणार आहे; पण त्यांच्याशी कोणताही संपर्क होत नाही. सध्या 'सार्क व्हिसा' आणि 'शॉर्ट टाईम व्हिसा' यांवर आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना २८ एप्रिलपर्यंत भारत सोडण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. वैद्यकीय उपचारांसाठी आलेल्या नागरिकांना आणखी २ दिवस वाढवून देण्यात आले आहेत. त्यांना ३० एप्रिलपर्यंत भारत सोडावा लागणार आहे.

जगाच्या पाठीवरील लहान लहान देशांमध्येही व्हिसाचा कालावधी संपताच तेथील पोलीस बाहेरून आलेल्या नागरिकाचा शोध घेत त्याच्यापर्यंत पोहोचतात. व्हिसाशिवाय देशात राहणे हा गंभीर अपराध असून अशा बाहेरील नागरिकांना ते अक्षरश गुन्हेगाराप्रमाणे वागणूक देतात. राज्याच्या गृहमंत्र्यांनी दिलेल्या वरील माहितीवरून भारतातील ही यंत्रणा किती कुचकामी आहे याची कल्पना येते. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पाकिस्तान हे भारताचे नेहमीच पहिल्या क्रमांकाचे शत्रूराष्ट्र राहिले आहे. आजतागायत भारतात जे आतंकवादी हल्ले झाले त्यातील बहुतांश पाकपुरस्कृत होते हे सर्वांनाच ज्ञात आहे असे असताना शत्रूराष्ट्रातील थोडे थोडके नव्हे तर सुमारे पाच हजार नागरिक भारतात अपुऱ्या कागदपत्रांविना येतातच कसे ? हा आकडा केवळ महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचा आहे, देशभरातील ही आकडेवारी याहून कितीतरी भयावह असू शकते. ज्यांचा व्हिसा कालावधी संपला आहे अशांशी संपर्क होत नसल्याचे गृहराज्यमंत्री सांगत आहेत मग अशांशी पोलीस यंत्रणा संपर्क तरी कशी करणार आणि त्यांना शोधून मायदेशी कशी पाठवणार ? आजतागायत देशात कितीतरी आतंकवादी हल्ले झाले. या हल्यात हजारो निरपराध नागरिकांचे बळी गेले तर हजारो निष्पाप नागरिक कायमचे जायबंदी झाले, कित्येकांचे संसार उध्वस्त झाले, कित्येकांच्या मनावर या आतंकवादी हल्यांचे भयंकर परिणाम कायमस्वरूपी कोरले गेले. देशाच्या मालमत्तेची अब्जावधी रुपयांची हानी झाली. पहलगाम येथे नुकताच झालेला आतंकवादी हल्ला भारताच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देणारा होता. केवळ हिंदू आहेत म्हणून २६ निरपराध हिंदूंची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. आतंकवादाला धर्म नसतो हे नॅरेटिव्ह आजतागायत लोकांच्या मनावर बिंबवले होते; मात्र या हल्ल्यानंतर या खोट्या नॅरेटिव्हचा पर्दाफाश झाला आहे. पुलवामा हल्ल्यानंतर केंद्र सरकारने जी कठोर भूमिका घेतली होती त्यानंतर यापुढे असे हल्ले होणार नाहीत असा भाबडा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला होता; मात्र या विश्वासाला पहलगाम हल्याने तडा गेला आहे. राज्याच्या गृहराज्यमंत्र्यांनी दिलेल्या उपरोक्त माहितीवरून पुलवामा हल्ल्यानंतरही भारताने धडा घेतलाच नसल्याचे दिसून येते. पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने देशभरात पाकिस्तानी नागरिकांचा शोध सुरु झाला आणि भयावह माहिती समोर आली. हा हल्ला झाला नसता सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानी नागरिकांचा शोध कदाचित घेतलाही नसता. किमान आतातरी सुरक्षा यंत्रणा सजग झाली आहे त्यामुळे येणाऱ्या काळात त्यादृष्टीने सरकार उपाययोजना करेलसुद्धा; मात्र सध्याची स्थिती पाहता राज्याची सुरक्षा व्यवस्था रामभरोसे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# चंद्रपूरचे सात नागरिक जम्मू-काश्मीरच्या पहलगाम मधून सुखरुप परतले...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, चंद्रपूर :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीत अडकलेल्या चंद्रपूरच्या सात नागरिकांना अखेर सुखरूप परत आणण्यात यश आले आहे. या संपूर्ण प्रयत्नात आमदार किशोर जोरगेवार यांचे विशेष योगदान राहिले.

चंद्रपूर मधील नागीनाबग वार्ड येथील अंकीत नगराळे, शिल्पा नळे, स्पर्श नळे, प्रितेश नळे, अजय गाडीवान, वर्षा गाडीवान आणि तेजस्विनी गाडीवान हे सात नागरिक पहलगामम ध्ये अडकले होते. दहशतवादी हल्ल्याच्या जवळपासच ते थांबलेले होते. माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी तात्काळ या कुटुंबीयांशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची चौकशी केली आणि त्यांना धीर दिला.

यानंतर, आमदार जोरगेवार यांनी मदत व पुनर्वसन विभागाचे संचालक सतीशकुमार खडके तसेच जम्मू-काश्मीर प्रशासनाशी थेट संपर्क साधून संबंधित कुटुंबीयांना सुरक्षित परत आणण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत मागितली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे स्थानिक प्रशासनाने तातडीने या नागरिकांशी संपर्क साधला आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. या सर्व हालचालींनंतर, आमदार जोरगेवार यांच्या पुढाकाराने या सात नागरिकांना घरी परत आणण्यासाठी रेल्वेचे तिकीट उपलब्ध करून देण्यात आले.

आज दुपारी १२ वाजता हे सर्वजण बल्लारपूर रेल्वे स्थानकावर पोहोचले. रेल्वे स्थानकावर भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व कुटुंबीयांनी आमदार किशोर जोरगेवार यांचे विशेष आभार मानले. हे कुटुंब सुरक्षित घरी पोहोचेपर्यंत मी स्वतः सतत प्रशासनाशी संपर्कात होतो. त्यांच्या घरी सुखरूप परत येणं हेच माझं कर्तव्य होतं एक दोन दिवसात आणखी काही नागरिक चंद्रपुरात पोहोचणार असून आपण सतत संपर्कात असल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आमदार जोरगेवार यांनी दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता विशेष उल्लेखनीय ठरली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे हजरत सुफी मोहम्मद इस्माईल शाहा उरूस

### ५ दिवसीय उरूसातून हिंदू- मुस्लिम ऐक्याचा संदेश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल सद्गुरू हजरत सुफी मोहम्मद इस्माईल शाहा मजीदी यांचा मंगळवार, दिनांक २९ आणि शनिवार, दिनांक ०३ मे २०२५ या कालावधीत पाचवा उरूस शरीफ साजरा करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सज्जादा नशीब सुफी संत रफिक उल अवलिया इस्माईली, सुफी संत इब्राहिममियाँ इस्माईली यांनी कार्यक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. कार्यक्रमासाठी पारनेर तालुका पोलिस प्रशासन, महसूल प्रशासन, टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत, पारनेर तालुक्यातील पत्रकार बांधवांचे गतवर्षीप्रम ाणे संपूर्ण सहकार्य असणार आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरातील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जाते. उरूस महोत्सवामध्ये संदल, मिरवणूक तसेच मनोरंजनाचा कार्यक्रम असे विविध कार्यक्रम होणार असून मोठ्या भक्तिभावाने कार्यक्रमास सर्व समाजबांधवांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न होणार असल्याची माहिती कार्यकारी विश्वस्त शिराज हवलदार यांनी दिली.

## विंचूर येथे पहलगाम हल्ल्याचा हिंदू समाजाकडून निषेध; शहर कडकडीत बंद




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय निरपराध पर्यटक आणि स्थानिक नागरिकांचा बळी गेला. या अमानुष हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी विंचूर येथील समस्त हिंदू समाजाच्या वतीने रविवार रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते प्रभू श्रीराम चौक विंचूर पोलीस चौकी पर्यंत मूक मोर्चा काढण्यात आला. तसेच हिंदू बांधवांनी पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. दहशतवाद्याना कठोर कारवाई करावी असे फलक हातात घेऊन या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. अशा घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने कडक पावले उचलावीत व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सपोनि भास्करराव शिंदे यांना समस्त हिंदू समाज विंचूर, सुभाषनगर, हनुमाननगर, विष्णुनगर, विठ्ठलवाडी, कृष्णवाडी ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले. यानिमित्ताने आज विंचूर शहरातील सर्व दुकाने बंद ठेवून कडकडीत बंद विंचूरकर यांच्या वतीने पाळण्यात आला. याला सर्व विंचूरकरांनी प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली होती.

## एपीएमसी मार्केट मध्ये कात्रीने हल्ला; आरोपी तासाभरात पोलिसांच्या ताब्यात

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२७, कल्याण (ठाणे) :** बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवार, दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०८.३० वा. ते ०९ वा. चे दरम्यान बाजारपेठ पोलीस ठाणे' हद्दीतील 'एपीएमसी मार्केट' मधील फुल मार्केट परिसरात आरोपी नाव विराग राजकुमार सोनी' वय २१ वर्ष धंदा फुल मार्केट राह. शिवकृपा चाळ, पत्री पूल कल्याण पूर्व व मयत चमनलाल नंदलाल कारला वय ५५ वर्ष व मयताचा मुलगा नामे कार्तीक यांचे मध्ये आज रोजी यातील आरोपो नाम विगग राजकुमार सोनी' वय २१ वर्ष व मयत इसम नाव चमनलाल नंदलाल कारला वय ५५ वर्ष या दोघाचे जळगाव वरून केळीचे पानाचे पाच बंडल हे मयत विक्री करिता आले होते. त्यापैकी एक बंडल हा आरोपी याचा हाता सदरच केळीच्या पानाचे बंडल मयत इसम चमनलाल करला याने यातील आरोपीला न विचारता विक्री करीता घेवुन गेला. सदर केळीच्या पनाचे बंडल आरोपी हा मयत इसमाकडे मागायला गेला असता मयत इसमाने में नहीं दूंगा, तेरे को जो करणा है ओ कर असे बोलल्याने सदर गोष्टीचा मनात राग धरून आरोपीत याने कात्रीने मयताच्या छातीवर, पोटावर वार करून जीवे ठार मारले आहे. तसेच आरोपी याने मयत याचा मुलगा कार्तिकः कारला व पत्नी नितुदेवी यांनाही कात्रीने वार करून जखमी केले आहे. सदर घटना घडल्याचे ३० मिनिटाचे आत आरोपी नाव चिराग राजकुमार सोनी' वय २१ वर्ष याम पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०३, कल्याण अतुल झेंडे व सहा पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे तसेच बाजारपेठ पो. स्टे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशमिग गौड पाचे मार्गदर्शनाखाली बाजारपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रमेश गाडवे पीलाम उपनिरीक्षक ज्ञानेश्वर गोरे, पोलीस उपनिरीक्षक/निसार तडवी, पोलीस शिपाई २५२३ विशाल राठोड पोलीस शिपाई/५५२४ अक्षय गिरी यांनी चक्कीनाका, कोळशेवाडी परीसरातून पळुन जात असताना शिताफिने, तात्काळ आरोपीला पकडून ताब्यात घेतले आहे.सदर बाबत बाजारपेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. २८१/२०२५ भा.न्या.सं. १०३(१), १०९. ११७(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाबासाहेब दुकले हे करीत आहेत. आरोपीतास कठोरात कठोर शिक्षा होईल याप्रमाणे पुढील तपास चालू असल्याची माहिती देण्यात आली.

## आजपासून अतनूर येथे अखंड हरिनाम सप्ताह व यात्रोत्सव

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२७, उदगीर (लातूर) :** पंचकोषीत प्रसिध्द असलेल्या जळकोट तालुक्यातील अतनूर येथील संजीवन समाधी श्री.घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या १४९ व्या संजीवन समाधी सोहळा निमित्त प्रतिवर्षोप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व यात्रोत्सव दिनांक २८ एप्रिल ते ५ मे २०२५ पर्यंत आयोजित केला आहे. या सप्ताहात सकाळी ६ ते ७ श्री.घाळेप्पा स्वामी यांचा रूद्राभिषेक, ७ ते १० श्री.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथ्यावरील भजन, २ ते ५ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन, रात्री १२ ते ४ हरिजागर, पहाटे ४ ते ६ काकडा आरती आदी कार्यक्रम सुरू राहणार आहेत. सप्ताहात सोमवारी दि.२८ रोजी ह.भ.प.संतोष महाराज अतनुरकर, दि.२९, ह.भ.प. कांचनताई शिवानंद शेळके आमदापुर, दि.३०, ह.भ.प.शेख शौकत महाराज उमरगेकर, दि.१ म. ह.भ.प.राऊतताई राऊत लातूरकर, दि.०२ मे रोजी ह.भ.प.संतोष पुरी महाराज चोळाखेकर, दि.०३ ह.भ.प.प्रकाश महाराज साठे बिडकर, दि.०४ दुपारी ह.भ.प.विश्वनाथ महाराज यांचे गुलालाचे कीर्तन, तर रात्री ह.भ.प.नागेश्वरी ताई झाडे आळंदीकर यांचे किर्तन होणार आहे. दि.०५ ह.भ.प.श्री.नवनाथ महाराज गोसावी डोंगरशेळकीकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तसेच अतनूर, चिंचोली, गव्हाण, गुत्ती, वडगाव, कोदळी, देऊळवाडी, हातराळ, दापका (गुंडोपंत), कोळनूर, डोरनाळी, वळंग, हिप्पळनारी, मरसांगवी आदी गावातील टाळकरी, भजनी मंडळी, भक्तगण, श्रोते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. या सप्ताहात दि.४ मे रोजी सार्वजनिक जागर व भारूडाचा दणदणीत कार्यक्रम होणार आहे.

# ग्रामीण भागात कारभारीण मिळणे झाले कठीण

## आम्ही लग्नाळू! हुंडा नको, सोनंही नको; फक्त पोरगी द्या...!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात लग्न जुळवण्यात अनेक अडचणी येत आहेत. शेतकऱ्यांच्या घरात नांदायला सून मिळणे कठीण झाले आहे. मुलांच्या लग्नाचे वय वाढत चालले असून, अनेक जण ४० च्या पार गेले आहेत, तर अनेकांनी लग्न जुळण्याची आशा सोडून दिली आहे.

त्यामुळे ग्रामीण भागातील विवाहेच्छुक तरुण व्यसनांच्या आहारी जाऊन नैराश्याकडे झुकत चालले आहेत. तरीही अनेक जण संयम ठेवून लग्न जुळवण्यासाठी जिवाचे रान करताना दिसत आहेत. एकूणच हुंडा नको, सोनं नको, फक्त पोरगी द्या मला..! अशी आर्त हाक आता लग्नाळू मुले देत आहेत.

सध्या लग्न जुळवण्यासाठी निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीत नात्यागोत्यातील मुलींसोबत लग्न



जुळवून घेण्याकडे उपवर मुलांच्या पालकांचा कल वाढला आहे. काही ठिकाणी नोकरी व्यवसाय, गाडी बंगला सर्वकाही असूनही मुलींच्या तसेच त्यांच्या पालकांच्या अवास्तव अपेक्षमुळे अनेकांचे विवाह रखडले आहेत. त्यातच शेतकरी मुलांची चांगलीच फरफट होत असून, त्यांना मुलगी मिळणे अत्यंत कठीण झाले आहे.

सध्या नोकरदारांसह व्यवसायिकांना

**लग्न जमवताना फसवणुकीच्या प्रकारांत वाढ**

लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याने ग्रामीण भागात अनेक तरुणांची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. फसवणूक करणाऱ्या अनेक टोळ्या सक्रिय कार्यरत झाल्या आहेत. पैसे, दागिने घेऊन लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच वधू पसार होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आधीच हौस त्यात पडला पाऊस अशी लग्नाळू तरुणांची अवस्था झाली आहे.

मुलींच्या कुटुंबीयांकडून प्राधान्य दिले जाते आहे. त्यामुळे शेतकरी नवरा नको गं बाई असे मुली म्हणतात. सध्या उपवर मुला-मुलींसाठी स्थळ शोधण्याच्या कार्यक्रमाला वेग आला आहे. भावी जोडीदार निवडताना मुलींना नोकरीसह मुलाकडे शेतीही हवी असते.

मात्र, शेतकरी नवरा त्यांना नको आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सामाजिक समस्या जटिल झाली आहे. शिकलेल्या मुली व त्यांचे पालक शिकलेला व सरकारी नोकरी व घरी थोडीफार शेती असलेल्या मुलांनाच पसंती देत आहेत. खाजगी नोकरी आणि सध्या कमी पगार असला तरी चालेल पण तो शहरात राहणारा असावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

जुन्या काळामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार तर कनिष्ठ नोकरी समजली जायची. आता मात्र उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि शेतीला कनिष्ठ दर्जा दिला जात आहे. पुर्वी ग्रामीण भागातील तरुण वधू वर सूचक केंद्रामध्ये नोंदणी करीत नव्हते, मात्र, आता वधू मिळत नसल्याने समाजातील वधू वर सूचक केंद्रामध्ये नोंदणी वाढली आहे. समाजातील मुलींचे प्रमाण कमालीचे कमी झाले आहे. परिणामी, ग्रामीण भागातील तरुणांना एजंटांची मदत घ्यावी लागत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद

## शाळा, महाविद्यालयांत अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन होणार;'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२७, धाराशिव :** आपल्या राज्य सरकारने अंमली पदार्थाबाबत 'झिरो टॉलरन्सचे' धोरण अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी राज्यभरातील शाळा, महाविद्यालयात अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन करण्याचे आवाहन केले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये अँटी नार्कोटिक्स क्लब सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना यापूर्वीच सूचित केले आहे. जिल्ह्यातील पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी ही त्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. प्राप्त सामाजिक परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेऊन जिल्हा प्रशासनही याबाबत आता तत्परतेने योग्य ती पाऊले उचलत असून लवकरच याची अंमलबजावणी होईल. अशी अपेक्षा मित्र चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे. जिल्ह्यातील तरुण पिढीला या गंभीर संकटातून वाचविण्यासाठी



तातडीने उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात अंमली पदार्थ विरोधी मोठी मोहीम उघडली आहे.तरुण पिढीमध्ये व्यसनांचे वाढते प्रमाण पाहता याला वेळीच पायबंद घालण्यासाठी सरकार अनेक उपाययोजना करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील महाविद्यालयामध्ये 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करणार असल्याची घोषणा केली आहे.

धाराशिव जिल्ह्यात देखील आपण केवळ ड्रग्ज नव्हे तर इतर सिगारेट, मद्य

आपल्या सरकारने अंमली पदार्थाबाबत झिरो टॉलरन्सचे धोरण अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी राज्यभरातील शाळा, महाविद्यालयात अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. तरुण पिढी अंमली पदार्थांचे सेवनासह सिगारेट, मद्य यासारख्या व्यसनांच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीला यापासून वाचवण्यासाठी ही अत्यंत उपयुक्त कृती असणार आहे. त्यामुळे प्रशासनासोबत पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी देखील यात सहभागी नोंदवावा. धाराशिव जिल्ह्यातील काही भागात अंमली पदार्थांची तस्करी व सेवनाचे प्रकार समोर आले आहेत. नागरिकांनी पोलिसांना दिलेल्या माहितीमुळे हे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे गृह विभागाला कारवाई करताना सहकार्य झाले.यापुढील काळात देखील आपल्या आजूबाजूला असे प्रकार घडत असतील तर तातडीने माहिती द्यावी. ड्रग्ज तस्करी, ड्रग्ज सेवनाची माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आश्वासन ही आ.पाटील यांनी यावेळी दिले आहे.

यासारख्या विविध घातक व्यसनांच्या विळख्यातून तरुणाईला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत आहोत.

तुळजापूर मतदारसंघातील महाविद्यालयात 'अंमली पदार्थ विरोधी क्लब' स्थापन करण्याच्या अनुषंगाने ६ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी धाराशिव, तहसीलदार तुळजापूर, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक व चार महाविद्यालयांच्या प्रचार्यांसोबत बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत पोलीस प्रशासन व पालकांनाही सोबत घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याच धर्तीवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन' करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेतली असून लवकरच त्याची अंमलबजावणी होणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# महापुरुषांचे विचारावर वाटचाल म्हणजेच खरे अभिवादन : माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, कराड :** महापुरुषांचे चरित्र खरे वाचनाने लोक प्रगल्भ होतात. महापुरुषांचे विचारावर वाटचाल करतात, ढोल ताशा लावून मिरवणुका काढण्यापेक्षा महापुरुषाचे विचारांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा, महापुरुषांच्या विचारांवर वाटचाल हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.

कराड येथील मुक्ता सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी



एडवोकेट संभाजीराव मोहिते, शेती मित्र अशोकराव थोरात, राष्ट्रीय काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानदास माळी, रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध कामगार नेते महेंद्र घरत, रोहिणी ढवळे,जयेश मोहिते, प्राध्यापक डॉक्टर मच्छिंद्र सकटे, प्रकाश वायदंडे,डॉ.मधुकर माने, संजय तडाके, पंचायत समिती सदस्य नामदेव पाटील, हरिभाऊ बल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. जयंतीचे औचित्य साधून यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा विविध पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श पत्रकार पुरस्कार विश्वास मोहिते, सामाजिक महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक कार्यातील उल्लेखनीय पुरस्कार एडवोकेट भारत मोहिते, उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार रोहिणी ढवळे, महेंद्र घरत डॉक्टर मच्छिंद्र सकटे,प्राध्यापक डॉक्टर शीला पाटील, सुरेखा उन्ने, जाकीर पठाण, दीपक लोखंडे यांना विविध क्षेत्रातील पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, जात धर्म आणि पंथापेक्षा आपण समाजाचे एक अविभाज्य घटक आहोत या विचारसरणीने काम केल्यास स्वतःलाही आत्मिक समाधान लाभेल त्याचबरोबर संविधानातील मूलभूत तत्वे आणि विचार जन माणसापर्यंत पोहोचवल्याचे समाधानी लाभेल. यावेळी स्वागत प्रास्ताविक संजय तडाखे यांनी केले सूत्रसंचालन सचिन तडाके यांनी केले तर आभार चंद्रकांत डाके यांनी मांडले.

# सुरुल गावचे सरपंच गणेश संकपाळ यांचे अपघाती निधन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण :** सुरुल ता, पाटण येथील सुरूल गावचे सरपंच गणेश शंकर संकपाळ यांचे अपघाताने निधन झाले. सूत्रांच्या माहितीनुसार शनिवार दि,२६, रोजी चारच्या सुमारास पाटण मणदुरे रोडने सुरुल गावाकडे दुचाकी वरुन दोघे निघाले होते गुजरवाडी फाट्याजवळ तीव्र वळण आहे ह्या वळनावरून डंपर पाटणच्या दिक्षेने येत होता तर दुचाकी चालक मणदुरेच्या दिशेने घरी जात होते दुचाकी चालकाला वळनावर अचानक डंपर दिसल्याने दुचाकी पडल्यामुळे गाडीचालक किरकोळ जखमी झाला पण पाठीमागे बसलेले गणेश संकपाळ तेही गाडीवरून घाली पडले. पडल्यानंत त्यांच्या



डोक्याला व छातीला पोटाला मार लागल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना प्रथम उपचारासाठी पाटण येथील ग्रामीण रुग्णालय येथे नेले तेथे ग्रामीण रुग्णालयामध्ये प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी कृष्णा रुग्णालय कराड येथे दाखल केले तेथील डॉक्टरांनी तपासणी केल्या नंतर गणेश संकपाळ यांना मुत घोषित केले.

